चिंतन

होय ,
शब्द तर ऐकणारे सर्व जण ऐकतात पण ज्यांचे चित्त शुद्‌ध सजग व निर्विकल्प असते अशाच चिताला त्या शब्दाचा लक्ष्यार्थ उमजतो .

अशुद्‌ध चित्त आपलेच अर्थ आपल्या पुर्व मान्यता नुसार काढत असतो .

मनाला येणारे सर्व अगदी सर्व अनुभव , भ्रम आहेत हे उमजणे सार आहे .

आपण एखादी गोष्ट एखाद्‌याला समजावुन सांगु शकतो पण
समजणे
वा
न समजणे , हे ऐकणाऱ्याच्या समजेवर अवलंबुन असते .

ऐकणारी व्यक्ती नासमज असेल तर स्वतः माउली / बुद्‌ध / कृष्णमुर्ति देखील प्रत्यक्ष समोर प्रकट झाली तरी अशा नासमझ व्यक्तीला आपल्या स्वतःच्या शब्दांचे खरे अर्थ समजावु शकत नाही .

ज्ञानी व्यक्तींच्या शब्दांचे लक्ष्यार्थ ,
समजणे वा न समजणे ,
आपल्या आपल्या ( ऐकणाऱ्याच्या )
पुर्व संचितानुसार घडते .

ज्ञानी व्यक्ती सर्वांना एकाच भाषेत , सारख्याच शब्दा मार्फत सांगतात,
पण शब्दा मागे लपलेले लक्ष्यार्थ
समजणे हे ज्याच्या त्याच्या पुर्व कर्मानुसार घडते .

संकुचित संस्कारात , संस्कारबद्‌ध माणुस ज्ञानी व्यक्तीच्या शब्दाचे अर्थ आपल्या आपल्या संस्कारानुसार काढत अर्थाचे बेअर्थ काढत असतो .

मन प्रक्रियेची जाण असेल
वा
द्रष्टाच दृश्य आहे
ही समज असेल

व

Art of listening
व
Art of observation
अवगत असतील ,
तरच
Real meditation समजत असते .

अन्यथा जीव  स्वतः च्या संस्कार रुपी , कल्पना विश्वात विहार करत असतो
व
आपण आपल्याच
भ्रमात जगत आहोत याचे भान देखील  जीवाला नसते .

आपण भ्रमात  आहोत हे ज्याला उमजते त्याचे  आंतरीक  प्रवेशाचे दरवाजे आपोआप उघडतात .

आत मधे  अजुन जास्त  गहन गहन  भ्रमाचे  द्रष्टा - दृश्य स्वरुपातील पडदे असतात , चारी अवस्थातील  द्रष्टा - दृश्य रुपी भ्रमाच्या  या  पडद्याना कठीण कठीण परीक्षा देत देत ,
पार  करणे  real meditation
आहे .

निसर्ग साधकाची पुर्ण परीक्षा घेत असतो  , साधकाला  real meditation मधे अगदी मृत्युच्या ही अनुभवाला सामोरे
जावेच लागते .

जे जे  खोटे meditation जगात प्रचलीत  असतात त्या ,
नाम -जप , तप  , पुजा , पाठ  , मंत्र ,तंत्र  सारख्या खोट्या meditation मधे
मृत्यु ला सामोरे  जाण्याचा प्रसंग  समोर येतच नसतो .

खोट्या meditation मधे
भ्रमीत साधक आपलेच  भ्रम , आपल्याच मान्यता
व
आपलेच पुर्व संस्कार
व
past conditionings  अनुभवत , धन्यता मानत असतो , जे पुर्ण अज्ञानात रमणे  आहे .

आपले  पारंपारीक अध्यात्म याच भ्रमीत प्रकारात मोडते ,
जे  द्रष्टा हा दृश्या पेक्षा भिन्न असल्याची अत्यंत अज्ञानी शिकवण साधकाना देत असते
व
कायमचे भवचक्रात अडकवुन ठेवत असतात , जे गुरु स्वत:च भ्रमात  अडकलेले आहेत
ते ईतराना कसे भ्रमातुन काढु शकतील .

असो .

09822992578

17-05-2022

vbpandhare@gmail.com

.........................................